**-: प्रेस नोट :-** **दिनांक १३/०९/२०२३**

**'' मेफेड्रोन (एमडी) अंमली पदार्थाचा मोठया प्रमाणात साठा बाळगणाऱ्या दोन आरोपीस मुंबई गुन्हे शाखेकडुन अटक..''**

अंमली पदार्थाच्या वाढत्या गुन्हेगारीस आळा घालण्याकरिता मुंबई पोलीसांनी विशेष मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमे अंतर्गत कक्ष -९, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई मागील काही दिवसांपासून अंमली पदार्थांची मोठया प्रमाणात खरेदी विक्री करणाऱ्या गुन्हेगारांच्या मागावर होते. या दृष्टिने प्रयत्न करीत असतांना डी. एन. नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन इसम मेफेड्रोन (एमडी) या अंमली पदार्थाचा मोठा साठा घेवून येणार आहेत, अशी विश्वसनीय बातमी कक्ष ९, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई चे प्रभारी पोलीस निरिक्षक दया नायक यांना प्राप्त झाली. सदर माहितीची प्रत्यक्ष खातरजमा केल्यानंतर कक्ष ९ च्या पथकाने महानगरपालिका उर्दु स्कुल, शाळा क्र. ०२ समोर, गिलबर्ट हिल रोड, मुन्शी नगर, डी.एन.नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००५८ येथे सापळा रचून ०२ आरोपींना शिताफीने ताब्यात घेतले. त्यांच्या अंगझडती मध्ये खालील प्रमाणे अंमली पदार्थ मिळून आले.

१) एक २६ वर्षीय पुरूष आरोपीच्या ताब्यातून एकुण १०१६ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एमडी) अंमली पदार्थ., किं.अं. रू. २ कोटी ३ लाख २० हजार (आंतरराष्ट्रीय बाजार भावानुसार )

२) एक २६ वर्षीय पुरूष आरोपीच्या ताब्यातून एकुण १०१७ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एमडी) अंमली पदार्थ., किं.अं. रू. २ कोटी ३ लाख ४० हजार (आंतरराष्ट्रीय बाजार भावानुसार )

**सदर मिळून आलेल्या एकुण २ किलो ३३ ग्रॅम मेफेड्रॉन (एमडी) या अंमली पदार्थाची आंतरराष्ट्रीय बाजार भावाप्रमाणे एकुण किंमत सुमारे ४ कोटी ६ लाख ६० हजार रूपये एवढी आहे.**

वर नमुद अंमली पदार्थाचा साठा जप्त करून आरोपी विरोधात या प्रकरणी गु.प्र.शा., गु.अ.वि. वि.स्था. गु.र.क्र. ६७/२०२३ (डी. एन. नगर पोलीस ठाणे वि.स्था.गु.र.क्र. ६०५/२०२३) कलम ८(सी), २२(सी), २९ एनडीपीएस कायद्याप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मा. वरिष्ठांच्या आदेशान्वये सदर गुन्हयाचा तपास कक्ष ९ कडून करण्यात येत आहे. या गुन्हयात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना सदरचा अंमली पदार्थाचा साठा पुरविणाऱ्या पाहिजे आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. दोन्ही अटक आरोपींना दिनांक १३/०९/२०२३ रोजी विहित वेळेत मा. न्यायालया समक्ष रिमांड करिता हजर करण्यात येत आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशि कुमार मीना, पोलीस उप-आयुक्त (प्र-१) श्री. अमोघ गांवकर, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण-पश्चिम) श्री. महेश देसाई, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण-उत्तर) श्री. काशिनाथ चव्हाण यांच्या मागदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. दया नायक, पो.नि सचिन पुराणिक, पो. नि दिपक पवार, स.पो.नि उत्कर्ष वझे, स.पो.नि महेंद्र पाटील, पो.ह.क्र. ३३११३/खडपकर, ९९०१९५/कोळी, ००.८६४/राऊत, ००.६५८/मोहिते, ०४.९००/पवार, ०६.१२८७/चौगुले, पो.शि.क्र. ०९.१७६५/भुमकर, ०९.३२७७/बनसोडे, पो.ह.चा.क्र. ३३९०१/परब, पो.ना.चा.क्र. ०५०६३२/निकम यांनी पार पाडली आहे.